३५

# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-५/बिन.विरोध निवडणूक खर्च/मंजूरी/६९०९/२०१७ दि.२७/०७/२०१७

प्रति,
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी,
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)

विषय :- *ब* वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूक खर्चात रु.१०,०००/- इतक्या मर्यादेत झालेल्या खर्चास मान्यता देणेबाबत.............................................................

संदर्भ :- प्राधिकरणाचे आदेश जा.क्र.रासनिप्रा/अ-ब वर्ग/नि.निधी/परिश्रमिक भत्ते/१०१५/२०१४, दिनांक ९.१२.२०१४

उपरोक्त संदर्भीय आदेशाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२/- प्राधिकरणाकडील उपरोक्त संदर्भीय आदेश दिनांक ०९.१२.२०१४ अन्वये, *अ* व *ब* वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूकातील होणा-या खर्चासाठी निवडणूक निधी व परिश्रमिक/भत्ते निश्चित करण्यात आले आहे. त्यामधील *ब* वर्गातील सहकारी संस्थांसाठी संस्थेचे कार्यक्षेत्र व सभासद संख्या विचारात घेऊन निवडणूक निधीची मर्यादा निश्चित केली आहे. मात्र प्राधिकरणाच्या असे निदर्शनास आले आहे की, कमी सभासद संख्या असलेल्या सहकारी संस्थांच्या बाबतीत (उदा. ५०, ६०, १०० सभासद) निवडणूक प्रक्रिया बिनविरोध पार पडूनही त्यांचा निवडणूक खर्च उक्त परिपत्रकीय मर्यादेपेक्षा जादा होतो. ब-याच सहकारी संस्थांचा निवडणूक खर्च हा मर्यादेपेक्षा जास्त तथापी रू. १०,०००/- पेक्षा कमी होत असल्याचे दिसून आलेले आहे. अश्या प्रकरणात मर्यादेपेक्षा जास्त होणारी खर्चाची रक्कम कमी असूनही प्रत्येक सहकारी संस्थानिहाय स्वतंत्र प्रस्ताव तयार करून जास्तीच्या खर्चाकरीता प्राधिकरणाची मान्यता घेण्याकरीता कार्यवाही करावी लागते. सदर कार्यवाहीस विलंब झाल्यास पुढील बाबी निर्माण होतात.

अ) मंजूर मर्यादेपेक्षा जास्तीच्या निवडणूक खर्चास मंजूरी व प्राप्त निवडणूक निधीचा जमा खर्च आणि रक्कम शिल्लक राहत असल्यास ती संबंधीत सहकारी संस्थेस परत करणेस विलंब होतो.

आ) यामुळे जि स नि अ / ता स नि अ यांचे निवडणूक निधीचे खात्यावर ब-याच रकमा प्रलंबीत राहत असल्याचे दिसून आलेले आहे.

इ) निवडणूक प्रक्रिया पूर्ण होऊनही निवडणूक खर्चास मंजूरी न घेतल्यामुळे संस्थांकडून प्राप्त झालेल्या निवडणूक निधीपैकी शिल्लक निधी संस्थांना परत करण्यास विलंब होत असल्यामुळे निवडणूक निधीच्या मान्यतेबाबत व उर्वरित रकमा परत मिळण्याबाबत संबंधीत सहकारी संस्थांकडून तक्रारी / पत्रव्यवहार प्राधीकरणास / वारंवार प्राप्त होत आहे.

उक्त बाबी टाळण्याच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, ज्या सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया बिनविरोध पार पडूनही प्राधिकरणाच्या दिनांक ०९.१२.२०१४ च्या परिपत्रकीय मर्यादेपेक्षा जादा निधी खर्च झाला आहे अशा संस्थांच्या बाबतीत रु.१०,०००/- इतक्या रक्कमेपर्यंतच्या खर्चाच्या प्रस्तावास खालील अटीस अधिन राहून मान्यता देत आहे.

१. प्राधिकरणाच्या दिनांक ०९.१२.२०१४ व दिनांक १६.११.२०१६ च्या परिपत्रकानुसार (जे परिपत्रक लागू असेल त्यानुसार) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक नियंत्रण कक्ष कर्मचारी यांच्या मानधनाची गणना करणेत यावी.

२. निवडणूक खर्चाची सर्व देयके/व्हौचरर्स जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दप्तरी स्वतंत्र धारिकानिहाय ठेवण्यात यावी.

३. उमेदवार अनामत ठेव रक्कम संबंधितांना परत केलेल्याचा पुरवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दप्तरी स्वतंत्र धारिकानिहाय ठेवण्यात यावी.

४. मंजूरीप्राप्त संस्थांचा निवडणूक हिशोब खर्च पुर्ण करुन शिल्लक निवडणूक निधी निवडणूक दिनांकापासून दोन महिन्याच्या आत संस्थेस रेखांकित धनादेशाद्वारे परत करण्यात यावा.

५. सदर संस्थांच्या १ ते ३१ कॉलम च्या विवरणपत्रातील माहिती प्राधिकरणास सादर करावी.

**मा आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरण यांचे मान्यतेने.**

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.